पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
गक्षेका/ ४ / कावि / ५ /२०१८
दिनांक : ३०/०१/२०१८

प्रति,

मा. ---- --------------- -

सदस्य/ सदस्या, ग प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
थेरगाव, पुणे-४११०३३

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची मासिक सभा **सोमवार दि. ५/२/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार **दिनांक ५/२/२०१८ रोजी सकाळी ११.००** वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह " येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक ७**

**दिनांक: ५/२/२०१८** वेळ: **सकाळी ११.०० वाजता**

---------------------------------------------------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार **दिनांक ५/२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता** ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह " येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

दि. ०१/१/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. ६ ) कायम करणे.

विषय क्रमांक १) मा.निकिता कदम यांनी दिनांक १/१/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील राधिका चौक येथे मनपाची मुतारी आहे. सदर ठिकाणाची मुतारी पाडुन सुलभ शौचालय बांधण्यात यावे अशी मागणी सदर परिसरातील नागरीक करत आहेत. तरी प्रभाग क्र.२१ मधील राधिका चौक येथील मुतारी पाडुन सदर ठिकाणी सुलभ पध्दतीने शौचालय बांधण्याचा ठराव माननीय ग प्रभाग समिती मध्ये करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २) मा.संदिप वाघेरे यांनी दिनांक ३०/१२/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये पवनेश्वर मंदिरासमोरील जागेमध्ये बहुउद्देशीय सभागृह बांधण्याचे काम नियोजित आहे. सदर जागेच्या शेजारील जागेमध्ये मोकाट जनावरांसाठी कोंडवाडा तसेच शिल्प उभारण्यात आलेले आहे. परंतु सद्यस्थितीमध्ये या दोन्हीही जागेचा वापर होतांना दिसत नाही. मोकाट जनावरांचा कोंडवाडा तर महापालिकेने नाममात्र भाडेतत्वावर भाडयाने दिला होता. आज ती जागा भाडेकरार संपुष्टात येऊन महापालिकेच्या ताब्यामध्ये आलेली आहे. तसेच शिल्प फक्त उभारायचे म्हणुन उभारण्यात आलेले आहे. त्या जागेची संकल्पना आजही पिंपरी गावातील नागरिकांच्या लक्षात आलेली नाही. तरी आपण नियोजित सभागृहामध्ये सदरच्या जागा विलीन करण्यात याव्यात जेणे करुन प्रभागातील मध्यम वर्गीय, गरजु कष्टकरी कुटुंबांना याचा लाभ घेणेत येईल. सदरच्या विषयास मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव -३३
गक्षेका /४/ कावि/०५/२०१८
दिनांक : ३०/०१/२०१८